ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २१ ❑ अंक २२१ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०५ कार्तिक शके १९४८, बुधवार दि.२८ ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

क्रौर्याची परिसीमा : कौटुंबिक वादाचा भडका

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

माणूस रागाच्या भरात सारासार विवेक गमावून बसतो, तेव्हा नात्यांमधील ओलावा, वात्सल्य आणि संवेदनशीलतेचा पूर्णपणे अंत होतो. कौटुंबिक कलह, अनिर्बंध व्यसनाधीनता आणि हिंसेची विकृती यांचा एकत्र उद्रेक झाल्यावर निष्पाप जीवांवर कसा भीषण आघात होतो, याचे अत्यंत विदारक आणि सुन्न करणारे वास्तव मुंबईतील एका घटनेने समोर आणले आहे. समाजात वाढणारा ताणतणाव आणि संवादाचा अभाव जेव्हा टोकाच्या आक्रमकतेत बदलतो, तेव्हा पोटच्या अपत्याचे अस्तित्वही धोक्यात येते. मुंबईच्या घाटकोपर परिसरात घडलेला अमानुष प्रकार मानवी मूल्यांना काळिमा फासणारा ठरला असून, त्यामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड खळबळ आणि संताप व्यक्त होत आहे.

घाटकोपर पूर्व येथील सर्वोदय नगर परिसरातील एका दाम्पत्याच्या कौटुंबिक विसंवादातून या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात झाली. सुमारे दोन वर्षांपूर्वी विवाहबद्ध झालेल्या या जोडप्याच्या संसारात व्यसनाधीनतेमुळे सातत्याने वाद निर्माण होत होते. पतीच्या नशेच्या आहारी जाण्याच्या सवयीमुळे घरात सतत तणावाचे वातावरण निर्माण होऊन भांडणे नित्याची झाली होती. या कलहाच्या सावटात अवघ्या नऊ महिन्यांच्या एका बालकाचे बालपण भरडले जात होते. हा अंतर्गत वाद केवळ घराच्या चार भिंतींपुरता मर्यादित न राहता थेट सार्वजनिक ठिकाणी पोहोचला आणि त्याचे रूपांतर एका अक्षम्य गुन्ह्यात झाले.

२५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास हा कौटुंबिक वाद टोकाला गेला. रात्री सुमारे दहा ते साडेदहा वाजण्याच्या दरम्यान संबंधित महिला आपल्या नऊ महिन्यांच्या बाळाला घेऊन घाटकोपर रेल्वे स्थानकाबाहेरील स्कायवॉकवर थांबली होती. त्याच वेळी तिचा पती तिथे आला आणि त्याने तिच्याशी पुन्हा कडाक्याचे भांडण सुरू केले. वाद विकोपाला जात असताना पतीने त्या चिमुकल्याला जबरदस्तीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. पत्नीने त्याला अडवण्याचा प्रयत्न करताच रागाच्या भरात बेभान झालेल्या पत्याने थेट मुलाला हिसकावून घेतले आणि स्कायवॉकच्या सुमारे २० फूट उंचीच्या रेलिंगवरून थेट खाली रस्त्यावर फेकून दिले.

उंचावरून थेट डांबरी रस्त्यावर आदळल्यामुळे त्या नऊ महिन्यांच्या चिमुकल्याच्या डोक्याला आणि शरीराच्या अंतर्गत अवयवांना अत्यंत गंभीर दुखापत झाली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बाळाला पाहून घटनास्थळी असलेल्या नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत त्याला सुरुवातीला नजीकच्या राजावाडी रुग्णालयात नेण्यात आले, परंतु प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने तात्काळ सायन रुग्णालयात हलवण्यात आले. सायन रुग्णालयातील अतिदक्षता विभागात डॉक्टरांनी चिमुरड्याचे प्राण वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, मात्र अंतर्गत रक्तस्त्राव आणि गंभीर दुखापतींमुळे अखेर उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली.

घटनेची भीषणता आणि प्रत्यक्षदर्शींचा आक्रोश लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवली. घाटकोपर पोलिसांनी पीडित आईच्या तक्रारीच्या आधारे तात्काळ कारवाई करत आरोपी बापाला ताब्यात घेतले. स्वतःच्याच निष्पाप रक्ताचा असा निर्दयीपणे बळी घेणाऱ्या आरोपीविरुद्ध खुनाचा गंभीर गुन्हा दाखल करून त्याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. हा प्रकार केवळ एका कौटुंबिक वादाची परिणती नसून, व्यसन आणि आवेगाच्या आहारी गेलेली व्यक्ती कोणत्या थराला जाऊ शकते याचे धक्कादायक उदाहरण आहे. एका निष्पाप नऊ महिन्यांच्या बालकाचा झालेला हा करुण अंत समाजमनाला अंतर्मुख करणारा ठरला आहे.

या संपूर्ण क्रूर घटनेनंतर एकच काळीज पिळवटून टाकणारा प्रश्न अनुत्तरित राहतोत्या निष्पाप जीवाचा नेमका काय दोष होता? ज्या वयात आईच्या मायेची ऊब आणि वडिलांच्या खांद्यावर सुरक्षित वाटायला हवे, त्या वयात त्याला क्रौर्याचा बळी पडावे लागले. नात्यांमधील कलह, अविचाराचा भडका आणि व्यसनाधीनतेतून आलेल्या संतापाच्या चटक्यात असा जीव होरपळून निघाला, ज्याला अजून हे जग काय आहे हे समजण्याचे वयही नव्हते. आई-वडिलांच्या भांडणात किंवा त्या कौटुंबिक विसंवादात त्या चिमुरड्याचे काय स्थान होते? तो ना कोणाच्या भांडणाचा भाग होता, ना त्या वादाचे कारण. तरीही त्याच्या वाट्याला ही निर्दयी शिक्षा का आली?

मुले ही स्वतःच्या मालकीची निर्जीव वस्तू नव्हेत, की ज्यांच्यावर आपला राग, वैफल्य किंवा सूड उगवला जावा. दुर्दैवाने, अनेकदा घरांमधील तणाव आणि हिंसक प्रवृत्तीचा सर्वात सोपा आणि असहाय्य बळी ही लहान मुलेच ठरतात. कायद्याच्या दृष्टीने आरोपीला बेड्या पडतील, खटला चालेल आणि शिक्षाही होईल; परंतु त्या निष्पाप जीवाला पुन्हा आणता येईल का? हा प्रश्न केवळ एका विकृत पित्यापुरता उरत नाही, तर तो आपल्या समाजाच्या मानसिक आरोग्याकडे आणि वाढत्या हिंसक वृत्तीकडे बोट दाखवणारा आहे. स्वतःचे मत मांडण्याचा, पळून जाण्याचा किंवा विरोध करण्याचा अधिकारही नसलेल्या त्या निरागस जिवाचा काय दोष होता, हा प्रश्न कायम अस्वस्थ करत राहील.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संस्कार रुजविणाऱ्या बालकलाकारांचा गौरव !

ज्ञान प्रकाश शिक्षण संस्थेत इको-फ्रेंडली श्रीगणेश मूर्ती स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण

ज्योतिर्मय साहित्य

नसरापूर (ता. भोर, जि. पुणे) / डॉ. श्याम कुलकर्णी –पर्यावरणाचे रक्षण आणि संस्कारांची जपणूक हा संदेश बालमनावर रुजविण्याच्या उद्देशाने श्रीभगवती सेवा आश्रम व जीवन कौशल्य विकास यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञान प्रकाश शिक्षण संस्थेच्या कृष्णाजी हरी कार्येकर प्राथमिक शाळा व विजय मुकुंद आठवले माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या इको-फ्रेंडली श्रीगणेश मूर्ती स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव समारंभ उत्साहात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याची जाणीव बालवयातच निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना विधिज्ञ श्री. विजयकुमार मालू ,डॉ. श्याम कुलकर्णी व अशोक राव यांच्या शुभहस्ते स्मृतिचिन्ह प्रदान



करून गौरविण्यात आले.

प्राथमिक शाळेतील विजेते : प्रणील योगेश राऊत, अनुष्का कुलदीप पाचकाळे व स्वराली सुरेश कुंभार.

माध्यमिक शाळेतील विजेते : सिद्धेश मांढरे, श्रावणी शिळीमकर व आरोही खुटवड.

याशिवाय दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांनाही पदके प्रदान करून त्यांच्या कलागुणांचे कौतुक करण्यात आले.

या प्रसंगी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मांढरे मॅडम व माध्यमिक शाळेच्या कांबळे मॅडम उपस्थित होत्या.


ज्ञान प्रकाश शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. श्री.शाम दलाल, डॉ.श्री.पुष्कर दलाल व कार्यक्रम संयोजक श्री.गिरीधर राठी यांच्या बहुमोल मार्गदर्शना खाली हा उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. गणेशोत्सव हा केवळ श्रद्धा आणि भक्तीचा उत्सव न राहता, तो पर्यावरण संवर्धना चा आणि भावी पिढीवर संस्कार घडविण्याचा प्रभावी माध्यम ठरावा, हाच या उपक्रमातून दिलेला मोलाचा संदेश आहे!

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा प्रसाद ग्रामगीता

ज्योतिर्मय साहित्य

तुकडोजींचा जन्म एकोणतीस एप्रिल एकोणीसशे नऊ रोजी विदर्भातील अमरावती तालुक्यातील यावली या खेड्यात एका अशिक्षित गरीब घराण्यात प्रतिकूल परिस्थितीत झाला असून त्यांचे वडील बंडोबा ठाकूर ब्रम्हभट्ट व आई मंजूळादेवि होत. वडिलांचा शिवणकाम व्यवसाय होता आणि आई कांडण, दळण करून उदरनिर्वाह करीत असत. त्यांच्या मुलाचे नाव माणिक होते, लहानपणा पासून ते एकतारी आणि खंजीर वादन करून लोका समोर किर्तन भजन करीत असत. त्यांच्या भजनाने प्रभावित होवून त्यांना त्यांच्या चौदाव्या वर्षीच त्यांना देव बाबा म्हणून संबोधले जाई. १९३६ साली ते महात्मा गांधीच्या सहवासात आले आणि १९४२ सालीच्या आंदोलनात गावोगावचे उपासक म्हणून कार्य केले. ह्या साठी त्यांना तुरूंगवासही झाला होता. त्यांच्या भजन करण्यावर बंदी पण आणण्याचा कठीण प्रसंग त्यांच्यावर ओढवला होता पण ते डगमगले नाहीत. विश्व नाम सप्ताह साजरा करीत राहून त्यांनी संपुर्ण देश हलवून सोडला. १९४३ मध्ये ''श्री गुरुदेव'' मासिक काढून श्री गुरुदेव सेना मंडळ स्थापन केले व ग्रामीण जनतेमध्ये आणि समाजाच्या विचार सरणी मध्ये बदल करण्याच्या प्रयत्नात राहिले. तेथूनच त्यांच्या विधायक कार्यास सुरुवात झाली.

म.गांधी, साने गुरुजी, मालवीय जी, यांचे प्रमाणेच राष्ट्रपती डॉ. राजेन्द्र प्रसाद पं.जवाहरलाल नेहरू, आचार्य कृपलानी आचार्य विनोबा भावे, भाई जयप्रकाश नारायण, आदी तत्कालीन मान्यवर नेत्यांनी तुकडोजीच्या असामान्य कार्याबद्दल गौरवच केला. त्याच काळात त्यानी ग्रामीण जनतेच्या लोकजागृती साठी गद्य आणि पद्य मिळून ३० पुस्तके लिहिली ती आजही मार्गदर्शक आहेत. १९४८ साली वर्धा येथे देश विदेशातील शांति दूतांनी त्यांच्या भजनांची मुक्त कंठाने स्तुति केली होती. त्यांनी जपान दौरा करून तेथील शांतिदूता ना प्रभावी संदेश दिला. जगातील ३८ राष्ट्राच्या समितीने त्यांची सल्लागार म्हणून



नियुक्ती केली. जगात सुधारणा करावयाची असल्यास प्रत्येक खेडेगाव प्रथम आदर्श झाला पाहिजे हे ध्येय मनात धरून त्यांनी ग्राम गीतेची निर्मिती केली जी ग्रामगीता आजही आदराने वाचली जाते. ही ग्रामगीता आठ पंचक मध्ये लिहिली असून प्रत्येक पंचक मध्ये पाच अध्याय आहेत व शेवटी ग्रंथ महिमा सांगितला आहे. ३० जानेवारी १९४९ साली डॉ. राजेन्द्र प्रसाद यांच्या हस्ते गुरु कुंज आश्रम मोझरी येथे ''राष्ट्रसंत'' ह्या पुरस्काराने सन्मानीत करून बहुमान देण्यात आला आहे. आश्विन शु पंचमी दिनांक ३० ऑक्टोंबर १९६२ साली त्यांचे निधन झाले. ३० ऑक्टोंबर ही त्यांची पुण्य तिथी असून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यास आजच्या काटकसर दिनी विसरू नये

इश्वरे व्यापिले हे विश्व
म्हणूनी जगची आम्हा देव
विश्वाचा मूळ घटक गाव
ग्रामगीता त्यासाठी होय

ग्रामगीता ही स्फूर्ती ने भरलेला सागर असून त्यात ग्रामीण जनतेच्या जीवना मध्ये अनेक आनंद लाटा उसळून येण्यासाठी, त्यांना स्थैर्य येण्यासाठी , सामाजिक प्रश्नाचे भान जागृती साठी, चंद्रभागेच्या काठावर पंढरपूर क्षेत्री विठूरायाच्या साक्षीने लिहीली आहे. तो पांडूरंग प्रसाद म्हणून सर्वांनी त्याचा स्वीकार करून त्यातील तत्वे आचरणात आणावी म्हणून ग्रंथ रूपाने १९५५ साली लिहीली आहे.

अनेक तज्ञा च्या मते संपूर्ण समाजाच्या उन्नतीचा मूलमंत्र म्हणजे ही ग्रामगीता होय. नावावरूनच ह्या ग्रंथाचे स्वरुप लक्षात येते. ग्रामीण समाजाचे तत्कालीन सत्य स्वरूप दर्शन ह्यातून झाल्याशिवाय रहात नाही, त्यांची उन्नती व्हावी मूलभूत सुधारणा गरजे प्रमाणे त्यांच्या पदरात पडाव्यात ही मूलभूत जीवन दृष्टी तुकडोजी महाराजाना स्वानुभवातून लाभली असावी म्हणून हा ग्रंथ त्यानी समाजा पुढे प्रकर्षाने ठेवला. म्हणून शहरी विद्वान लोकांनी डोळसपणे ह्या ग्रामगीता कडे पहावे लागेल, म्हणूनच महात्मा गांधी म्हणत खेड्या कडे चला खेड्यांचा विकास म्हणजे पर्यायाने राष्ट्राचा विकास ठरणार आहे .

ज्ञानेश्वर महाराजानी ज्या प्रमाणे पसायदान मधून विश्व शांती ची परमेश्वरा कडे मागणी केली त्याच प्रमाणे ग्रामगीता अर्पण पत्री के मधून खेड्यातील लोका साठी तुकडोजी महाराजानी केले आहे. हे विशेष वाटते.

सर्व ग्रामासि सुखी करावे
अन्न वस्त्र पात्रादि द्यावे
परि स्वतः दुःखचि भोगावे
भूषण तुझे ग्राम नाथा

ग्रामस्था ना भोळ्या शंकराची उपमा देवून त्यांचा स्थर उचंवला आहे. शेवटी ते परमेश्वरा कडे इतकेच मागतात की

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो
सकळांचे लक्ष तुजकडे वळो
मानव तेचे तेज झळझळो
विश्वा माजी या योगे

संत तुकडोजी महाराजानी आपल्या ओव्या नुसत्या लिहील्या नाहीत तर त्यांच्यातील सत्य, गुह्य गोष्टी गावोगावी जाऊन खंजरी भजनाच्या माध्यमातून प्रत्येक ग्राम वासीया पर्यंत पोहचविणे चा उपक्रम सातत्याने हाती घेवून पूर्ण केला. ह्यासाठी त्यांनी कष्टाचा डोंगर पार केला त्याच मुळे त्यांना साधु त्वाचा गाभा ही लाभला होता संताची लक्षणे त्यांच्या अंगी भिनले होते . त्यांचे ग्रामीण भागातील कार्य स्वयंभू आहे असे विनोबा भावे त्यांच्या बद्दल मत व्यक्त करून भूदान कार्याची अनेक ग्राम सभेमध्ये प्रशंसा करीत, ह्या वरून तुकडोजी महाराज यांची वैचारिक उंची कमी करू शकत नाही. भूदानयज्ञात त्यांचे बहुमूल्य सहकार्य झाले आहे.



आर. पी. दुसे
छ. संभाजी नगर 9422202747

संत तुकडोजी महाराज यांच्या बद्दल ख्यातनाम साहित्यिक वि. स. खांडेकर एका ठिकाणी आपले मत व्यक्त करताना म्हणतात, तुकडोजी महाराजांची ची श्रद्धा देवावर होतीच पण त्यांचा खरा देव अर्धपोटी राहणाऱ्या, अज्ञानी, दारिद्री मध्ये राहणाऱ्या, संकटाच्या पाशात सापडून अगतिक झालेल्या, दीन, दुबळ्या, कष्टकरी देश बाधंवा मध्ये आहे. ज्याना विधवेचे अश्रू पुसता येत नाहीत किंवा अनाथ अर्भकाच्या तोंडात अन्नाचा घास देता येत नाही असा धर्म आणि ईश्वर त्यांना मान्य नव्हता इतका गरजूं च्या सेवेबद्दल त्यांना आकर्षण होते हा विचारातील प्रांजळपणा त्यांनी आयुष्य भर सातत्याने जपला म्हणूनच त्यांचा समाजाने महत्वाचे संत स्थान दिले आहे हे त्यांचे विचार स्वामी विवेकानंदाच्या विचारांशी मिळते जुळते होते म्हणून ते आज सर्वांना आदर्श व्यक्ती वाटतात

त्यांची खंजरी वरच्या मधुर गीतानी ग्रामवासीयांना वेडच लावले होते एक प्रकारची सकारात्मक उर्जा त्यापासून निर्माण होत होती हळूहळू ग्रामस्थ आपल्या विचारात त्यांचे मार्गदर्शन सकारात्मक दिसत होते. भजन करण्या मधून लोक जागृती व्रत पाळत होते. ते म्हणत

गावा गावासि जागवा
भेदभाव समूळ मिटवा
उजळा ग्रामोन्नती चा दिवा
तुकड्या म्हणे

तुकडोबा ग्रामस्थाना समजून सांगताना म्हणत कोणी मोठा छोटा नसतो तसेच कोणतेही काम करणे हलके पणाचे लक्षण नसतेच त्यासाठी श्रीकृष्णा कडे पहावयाचे शिका, तोही गवळी म्हणून गायी राखीत होताना ? अशीही ग्रामगीता ग्रामस्थ यांचे साठी एक प्रकारचा ग्रंथराज म्हणावा लागेल

संत तुकडोजी यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना असे निदर्शनास येत की, चांगल्या वाईट ग्रामीण जनतेमध्ये वावरताना अनेक अनुभव त्यांना आले त्यांची आपल्या मधून श्लोकामधुन ग्रामगीता ४१ अध्यायमधून नुसते प्रबोधनात्मक सादरीकरण केलेले नसून त्यावर आपले प्रभावी मत अनेक दृष्टांतांमधून उपाय पण सकारात्मक रितीने ग्रामीण जनतेला समजतील अशा भाषेतून सांगितले आहेत. शिवाय भजनाच्या माध्यमातून त्यांचे अंधारी विचार दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून ग्रामगीता हा अमूल्य ग्रंथ असून त्यांच्या ऱ्हदयाचा तो भाग आहे असे त्यांना वाटते.



जात्यावरच्या ओव्या.....

नाही पडलास पाण्या
काय विकू काय खाऊ
रिण डोक्यावरच
कस फेडू कुठं जाऊ ॥९११॥

नाही पडलास पाण्या
लेक घरात नवरी
पिवळे हात करणार
होतो तुझ्या जीवावरी ॥९१२॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ८४

ज्योतिर्मय साहित्य

विठोने शिरी वाहिला देवराणा ।
तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा ।
निवाला स्वये तापसी चंद्रमौळी ।
जिवा सोडवी राम हा अंतकाळी ॥८४॥

अर्थ : प्रत्यक्ष विठ्ठलाने देवराणा म्हणजे श्रीशंकराला डोक्यावर धारण केले आहे. त्या श्रीशंकराच्या हृदयात मात्र रामनामाचा ध्यास आहे हे आपल्याला माहिती नाही का ? मस्तकी चंद्र धारण करणाऱ्या महान तपस्वी अशा भगवान शंकराचा दाह रामनामाने शांत झाला. आपल्या अंतकाळी रामनामच आपल्याला सोडवणार आहे.


(विठोने - विठ्ठलाने, देवराणा - देवांचा राजा /महादेव, नेणा - जाणत नाही, तापसी -तपश्चर्या करणारा, चंद्रमौळी - शिरावर चंद्र धारण करणारा (शंकर), निवाला - शांत झाला)


विवेचन :


रामनामाचे महत्व पुन्हा स्पष्ट करणारा हा सुंदर श्लोक आहे. पंढरपूरचा पांडुरंग म्हणजे सर्व संत, वारकरी यांचे दैवत. पांडुरंग हा श्रीकृष्णाचाच अवतार मानला जातो. असा हा भक्तांचा लाडका असणारा पांडुरंग स्वतःच्या मस्तकावर श्रीशंकराला धारण करतो. पांडुरंगाच्या डोक्यावर शिवाच्या पिंडीचा आकार दिसतो. दुसरी गोष्ट म्हणजे पांडुरंग स्वतःच श्रीशंकराचे गुणगान करतो. या अर्थाने देखील तो शंकराला डोक्यावर घेतो असे म्हणता येईल. कारण एखाद्याचे गुणगान करणे म्हणजे त्याला मस्तकी बसवणे. तेच पांडुरंगाने केले आहे.पण समर्थ पुढे म्हणतात की ज्या विठ्ठलाने श्रीशंकराला आपल्या शिरावर घेतले आहे, त्या भगवान शंकरांच्या हृदयात देखील रामानामाचा ध्यास आहे. या ठिकाणी श्रीरामाचे आणि रामनामाचे महत्व फारच सुंदररित्या आपल्याला पटवून दिले आहे. आणखी एक गोष्ट म्हणजे समर्थ रामनामाचे श्रेष्ठत्व आपल्या मनावर ठसवण्यासाठी वारंवार श्रीशंकराचे उदाहरण का देत आहेत याचाही विचार केला पाहिजे. ज्यांच्याकडे अथांग ज्ञान आणि वैराग्य आहे, तेच जर नामाचा आश्रय घेत असतील, तर आपल्यासारख्या सामान्य माणसाचा अहंकार गळून पडायला हवा, हाच समर्थांचा यामागील हेतू असावा. **(क्रमशः)**











श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामाचा अनुभव

ज्योतिर्मय साहित्य

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.

भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते. दुःखाची जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

***



एकाच रंगाच्या वासरासह चांगल्या स्वभावाच्या, दूध देणाऱ्या गाईची चंदनादिकांनी अभिषेक करून आणि फुलांच्या हार घालून पूजा करावी. या दिवशी तेलात तळलेले, भांड्यात शिजविलेले अन्न खाणे टाळावे. तसेच गाईचे दूध, दही, तूप सेवन करू नये. हे पूजन, हे एक व्रताचा भाग आहे. व्रताच्या नियमा प्रमाणे काही गोष्टी करण्याच्या टाळणे, अनुशासित भोजन हे मनाची शुद्धी, पवित्रता, सातत्य वाढविते, आणि असे नियम पालन केल्यामुळे व्रत फलदायी ठरते. दिवसाचे शेवटी जेव्हा सूर्याचा अर्धा भाग दिसतो व आणखी सूर्यास्त व्हावयाचा असतो, तेव्हा निरंजन विधी करावा आणि शुभ अशुभ चिन्ह पहावेत.

दाराच्या उंबरठ्या जवळ दिव्यांची आरास मांडावी या दिव्यांचे ज्योतीचे निरक्षण करून आगामी काळातील शुभ अशुभ संकेत कळू शकतात. हे पहावेत, असे स्कंद पुराणात सांगितले आहे.

आपल्यापैकी बरेच जनांचे मन कमकुवत झाले असल्यामुळे, हे संकेत कोणते? ते मी मुद्दामहून येथे देत नाही. कारण काही लोकांना अशुभ चिन्हे दिसली तर त्यांचे मन नैराश्यात बुडून जाऊ शकते.





॥ श्री दत्त महिमा ॥

लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड



''आम्ही काय कुणाला मागतो तो दत्त आम्हाला देतो''

ज्योतिर्मय साहित्य

''आम्ही काय कुणाला मागतो तो दत्त आम्हाला देतो''

याचे स्मरण होण्याचे कारण दत्त संप्रदाय दत्त म्हणजे देणे आपण सर्वजण जाणतो. वाचादत्त, ईश्वरदत्त,निसर्गदत्त म्हणजे वाचेने दिलेले,ईश्वराने दिलेले, निसर्गाने दिलेले.

जसे ब्रम्हा विष्णू महेश या

त्रिदेवांनी अनुसया मातेला

वरदान दिले की आम्ही तुझ्या पोटी पुत्र म्हणून जन्म घेऊ असा शब्द दिला व तो दत्तरूपानी पूर्णही केला.

आजही भाविकांना याची प्रचिती येते दत्त महाराजांना भावनेने श्रद्धेने काही मागा दत्त महाराज त्याची पूर्तता करतात. असा अनुभव अनेक दत्त भक्तांना नेहमी येत असतो

दत्त महाराजांचे एक नाव स्मतृगामी असे आहे.अर्थात स्मरण करताच गमन करणारे. आपण दत्त महाराजांचे स्मरण केले की ते आपल्या जवळून वायुरूपाने गमन करतात हि आपली मनीषा पुर्ण करण्याची एक पायरी असते. म्हणुन संत एकनाथ महाराज यांनी

अभंगात म्हंटले आहे.

दत्त दत्त म्हणता नित्य
करी नामे गुणातीत
दत्त नामा चा निज छंद
हृदयी प्रगटे परमानंद
एका जनार्दनी दत्त
सबाह्य स्वानंदे भरीत

ज्यात स्वतः ला नित्य छंद असावा मग परमानंद प्राप्त होतो आणि तो अंतरबाह्य भरतो.

प्रत्येक भाविकांना याचा लाभ घेता यावा यासाठी

''कृतार्थ करण्या जन्म आपुला नित्य भजा गुरुवरा''

''स्मरा स्मरा हो दिगंबरा ला
स्मरा''

दत्त महाराज देण्यास तयार असताना आपणही घेण्यास तयार असावे. नसता देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी असे होऊ नये.


आपण सुज्ञ व जाणते आहोत

दत्त साधनेचा लाभ घ्यावा चिंतन करावे म्हणूनच

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त

***





१ नोव्हेंबरपासून प्रल्हादजी अभ्यंकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – मराठवाडा युवक विकास मंडळाची स्व. प्रल्हादजी अभ्यंकर स्मृती व्याख्यानमाला यंदा २७ व्या वर्षात पदार्पण करत आहे. रविवार, दि. १ ते मंगळवार ३ नोव्हेंबरदरम्यान या व्याख्यानमालेत युवकांची भूमिका, मराठवाड्याचा दुष्काळ आणि नव्या भारतापुढील आव्हाने या विषयांवर विचारमंथन होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे यांनी बुधवारी, २८ रोजी पत्रपरिषदेत दिली. गेल्या २६ वर्षांत या व्यासपीठावर नितीन गडकरी, गोपीनाथराव मुंडे, राम माधव, विनय सहस्रबुद्धे, दत्तात्रेय होसबळे, डॉ. सुब्रमण्यम स्वामी, उज्वल निकम, तरुण विजय, विवेक घैसासी आणि प्रशांत हरतालकर यांसारख्या तज्ज्ञांनी विचार मांडले असल्याचे ते म्हणाले.

रेल्वेस्टेशन रोडवरील भानुदास चव्हाण सभागृहात रविवार, १ नोव्हेंबर रोजी बदलते विश्व, बदलता भारत : युवकांची भूमिका (जेन झी) या विषयावर ज्येष्ठ पत्रकार विलास बडे यांचे व्याख्यान होईल. सोमवार, २ नोव्हेंबर रोजी मराठवाड्याचा दुष्काळ व शिरपूर पॅटर्न या विषयावर भूजलशास्त्रज्ञ सुरेश खानापूरकर मार्गदर्शन करतील. मंगळवार, ३ नोव्हेंबर रोजी नये भारत का उदय और षड्यंत्रों का चक्रव्यूह या विषयावर राजकीय विश्लेषक हर्षवर्धन त्रिपाठी यांचे व्याख्यान होईल.

विद्यार्थी, युवक, अभ्यासक आणि नागरिकांनी या वैचारिक पर्वात सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे व सचिव ॲड. अरविंद केंद्रे यांनी केले आहे. यावेळी मंडळाचे सचिव ॲड. अरविंद केंद्रे, प्रचार प्रमुख प्रा. नामदेव कराड, धनंजय ब्रम्हपूरकर, प्रा. मनोहर बन्सवाल, तृप्ती पालोदकर आदी उपस्थित होते.

बॉक्स : विषय व वक्ते

रविवार, १ नोव्हेंबर बदलते विश्व, बदलता भारत : युवकांची (जेन-झी) भूमिका ज्येष्ठ पत्रकार विलास बड/अध्यक्ष : धनंजय आकात

सोमवार, २ नोव्हेंबर मराठवाड्याचा दुष्काळ व शिरपूर पॅटर्न- सुरेश खानापूरकर अध्यक्ष : रमेश पांडव

मंगळवार, ३ नोव्हेंबर नये भारत का उदय और षड्यंत्रों का चक्रव्यूह – हर्षवर्धन त्रिपाठी; अध्यक्ष : बबनराव जगाडे वेळ : दररोज सायंकाळी ६.३० वाजता.

भारतीय ज्ञान शाखांचे एकात्मीकरण : काळाची गरज

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या भारत देशाला ज्ञानाची अखंड परंपरा लाभलेली आहे .वैदिक काळापासून ते आज तागायत विविध ज्ञान शाखांनी ती सांभाळली आहे. पुर्वीची गुरूकुल पद्धती वेदांवर आधारित होती. ही शिक्षण व्यवस्था राजसत्तेच्या नियंत्रणापासून मुक्त होती हे तिचे वैशिष्ट्ये होते. कालांतराने इसवी सन आठवे शतक ते अठराव्या शतकापर्यंत शिक्षण पद्धतीचे स्वरूप धार्मिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक असे बदलत गेले. मुस्लिम राजवटीच्या प्रभावामुळे यात प्रवाह पडले गुरुकुल आणि पाठशाला मकतब आणि मदरसा. हे प्रवाह धार्मिक ग्रंथांना सर्वोच्च प्राधान्य देणारे होते. नंतर लौकिक विषयांचा समावेश या प्रवाहातील अभ्यासक्रमात केला गेला ,ज्यामध्ये साहित्य, इतिहास ,गणित, ज्योतिष शास्त्र ,आयुर्वेद, युनानी वैद्यकशास्त्र या विषयांचा समावेश करण्यात आला. रोजगारभिमुख शिक्षण मात्र फक्त कुटुंबातच दिले जाई. विविध कला हस्तकला एवढेच काय ते व्यावसायिक शिक्षण. भारतीय आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीवर मात्र दिर्घकाळ ब्रिटिशांचा प्रभाव राहिला. आजही पालक प्रवेशासाठी मुलांना घेऊन शाळेत आले की माध्यम इंग्रजी च हवे असा आग्रह करतात. खरे तर ब्रिटिशांनी प्रशासकीय कामांसाठी इंग्रजी जाणणारे कर्मचारी तयार करण्याच्या उद्देशाने आधुनिक आणि औपचारिक शिक्षणाचा पाया रचला. यासाठी १८१३ मध्ये सनद कायद्याची अंमलबजावणी करत भारतीय साहित्य आणि विज्ञानाच्या प्रसारासाठी निधीची तरतूद करण्यात आली. १८३५ मध्ये मेकॉलेच्या शिफारशीनुसार इंग्रजी हे शिक्षणाचे माध्यम बनले. पुढे ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, राजा राम मोहन रॉय ,शाहू महाराज यांनी तळागाळातील विशेषत: महिलांच्या शिक्षणासाठी चळवळ उभी केली. १९६८ ला कोठारी आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांवरून पहिले भारतीय राष्ट्रीय शिक्षण धोरण अंमलात आले .नंतर १९८६ ,१९९२ पर्यंत हे धोरण नवीन ध्येय आणि उद्दिष्टांना समोर ठेवून बदलत गेले. २९ जुलै २०२० ला ३४ वर्ष जुन्या शिक्षण धोरणाच्या जागी नवीन धोरण लागू करण्यात आले. या शिक्षण धोरणाचा मुख्य उद्देशच एका समग्र बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे हा आहे. हा उद्देश परत आपल्याला प्राचीन भारतीय ज्ञान शाखांकडे घेऊन जातो .कारण ज्या कालखंडामध्ये भारतामध्ये ही बहुविद्याशाखीय शिक्षण पद्धती अवलंबल्या जात होती तेव्हा भारत स्वायत्त, समृद्ध होता. देशोदेशींचे विद्यार्थी नालंदा ,तक्षशिला येथे विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी येत असत. जगभरामध्ये असे निवासी विद्यापीठ भारतात होते हे नव्याने सांगायला नको.



कृषी ,अभियांत्रिकी, भाषाशास्त्र ,साहित्य ,गणित, खगोलशास्त्र, प्राणीशास्त्र, शरीर शास्त्र, तत्त्वज्ञान, अध्यात्म, योग ,स्थापत्य, क्रीडा ,साहित्य औषधशास्त्र, वन व्यवस्थापन ,खेळ, पारंपारिक पीक लागवड तंत्र, नैसर्गिक शेती, आदिवासींचे ज्ञान ,पारंपारिक व्यावसायिक शिक्षण या सर्व विद्या शाखांना भारतीय ज्ञानाने जोपासले आहे .आज आपण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावर हवे ते आत्मसात करण्याच्या प्रयत्नात आहोत परंतु या हव्यासापायी आपले खरे ज्ञान कौशल्य आपण विसरता कामा नये .आज नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जरी अडचणी येत असल्या तरी त्यावर मात करत आमचे शिक्षक नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून कृती, उपक्रम, प्रयोग, प्रकल्प व अनेक अध्यापन पद्धतींचा वापर करून उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करत आहेत. प्रशासकीय स्तरावरूनही प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षक सजग सर्जनशील आणि प्रवाही होत आहेत. विद्यार्थी केंद्रित असलेली असलेले हे शैक्षणिक धोरण समता या घटनात्मक मूलतत्त्वावर आधारित आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात देश पातळीवर याचे सकारात्मक बदल दिसून येतील हे निश्चित !

बांधिलकी बहुउद्देशिय ट्रस्ट तसेच शारदा सखी मंडळ आयोजित 'झंकार भूलाबाईची गाणी आणि कविता' कार्यक्रम उत्साहात संपन्न !



ज्योतिर्मय साहित्य

अमरावती – बांधिलकी प्रतिष्ठान, बांधिलकी बहुउद्देशीय ट्रस्ट आणि शारदोत्सव सखी मंडळ, नंदनवन कॉलनी, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'झंकार भूलाबाईची गाणी आणि कविता' हा सांस्कृतिक कार्यक्रम शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी नंदनवन कॉलनीतील भेंडकर यांच्या निवासस्थानी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

भूलाबाईच्या पारंपरिक गीतांमधून मराठी संस्कृती, लोकपरंपरा आणि स्त्रीमनातील भावविश्वाचा सुरेल आविष्कार या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. पारंपरिक लोकगीतांसोबतच कविता आणि आधुनिक अभिव्यक्ती यांच्या संगमाने कार्यक्रमाला वेगळी रंगत प्राप्त झाली.लोकसंस्कृतीचे जतन आणि नव्या पिढीपर्यंत तिचा वारसा पोहोचविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमात मा. सुनीता तायडे आणि मा. जया ओळंबे यांनी भूलाबाईची गाणी व कविता सादर केल्या. पारंपारिक गाणी व आधुनिक गाण्यांचा मेळ घालत कार्यक्रम रंगला.मा. रोशनी कडू यांनी सूत्रसंचालन केले, तर ॲड. नीता प्रफुल्ल कचवे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश आणि लोकपरंपरेचे महत्त्व विशद केले.

छाया बर्वे तसेच नीता कचवे यांनीही आधुनिक भूलाबाईचे गीत सादर केले .बांधिलकी प्रतिष्ठान व संबंधित संस्थांच्या सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून मराठी लोककला, साहित्य आणि परंपरा यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. 'झंकार' या कार्यक्रमाने पारंपरिक सांस्कृतिक वारशाला उजाळा देत उपस्थितांच्या मनात आनंदाचे आणि आपुलकीचे सूर उमटविले.

दक्षिण भारतातील मराठ्यांच्या कर्तुत्वामुळे बौद्धिक व सांस्कृतिक उत्कर्ष

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

१७९९ नंतर तंजावरचे राजे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या राजकीय नियंत्रणाखाली आले. सरफोजी दुसरे यांनी प्रशासनाचे अधिकार कंपनीला सोपवले, पण त्यांना राजवाडा, मानमर्यादा आणि सांस्कृतिक संरक्षणाची संधी मिळाली.१८३२ मध्ये सरफोजी दुसरे यांचे निधन झाल्यावर त्यांचे पुत्र शिवाजी तिसरा गादीवर आले. तो १८५५ मध्ये वैध पुरुष वारस नसताना मरण पावला. त्यावेळी लॉर्ड डलहौसीच्या 'डॉक्ट्रिन ऑफ लॅप्स'च्या धोरणानुसार ब्रिटिशांनी तंजावरचे राज्य मद्रास प्रेसिडेन्सीत विलीन केले. म्हणजे भोसल्यांची राजकीय गादी १८५५ मध्ये खालसा झाली; पण त्यांचा सांस्कृतिक वारसा मात्र संपला नाही.

तंजावरच्या भोसल्यांचे योगदान हे फक्त एका घराण्याचे यश नव्हे. ते भारतीय संस्कृतीच्या संक्रमणाचे आणि संवर्धनाचे उत्तम उदाहरण आहे. उत्तरेकडील महाराष्ट्रात




मराठ्यांनी औरंगजेबाविरुद्ध स्वातंत्र्याचे रक्षण केले, तर दक्षिणेत त्यांचेच वंशज व नातेवाईक यांनी कला, भाषा, धर्म आणि विद्वत्तेचे रक्षण केले. एकाच भोसले वंशाने एकीकडे राजकीय स्वातंत्र्याचा लढा आणि दुसरीकडे सांस्कृतिक उत्कर्षाचा वारसा जोपासला.तंजावरची भरतनाट्यम परंपरा, कर्नाटक संगीत, तंजावर चित्रे, बृहदीश्वर मंदिराची जीर्णोद्धारे आणि सरस्वती महाल ग्रंथालय यांमुळे हे स्पष्ट होते की, राज्य संपले तरी संस्कृती संपत नाही.

'मराठ्यांचे दक्षिण भारतातील कर्तृत्व' या विषयावर ३ महिन्यातून किमान एकदा अशा संशोधनात्मक चर्चा घडवून ग्रंथ स्वरूपात त्या प्रकाशित करण्याचे ठरविण्यात आले.विशेषतः सातारकरांसाठी हे सर्व अभिमानास्पद आहे.


***











मन के हारे हार हैं, मन के जीते जीत रे

ज्योतिर्मय साहित्य

ईश्वराने आपल्याला मनुष्य जन्म दिला आहे. याहून इतर कोणतीच गोष्ट सुंदर असू शकत नाही. माणूस जन्म म्हणजे अतिशय कठीण कसरत. पण ही कठीण कसरतंच आपल्याला यशाच्या शिखरावर नेऊन पोहोचवते. जोपर्यंत आपण कठीण परिश्रम करत नाही तोपर्यंत यश मिळणे वा मिळवणे फारच कठीण, म्हणून प्रयत्नांना कष्टाची जोड असावीच लागते. इतरांकडे बघून शिकण्यासारखे बरेच काही असते मात्र आपण त्यांच्याकडून काय घ्यावे काय घेऊ नये हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असते. एखादी गोष्ट करत असताना त्या आधी त्याची सखोल माहिती घेणे अत्यावश्यक असते.

माणूस कोणतीही गोष्ट एका दिवसात करू शकत नाही मात्र, एक दिवस नक्कीच करू शकतो. दिव्यांग व्यक्ती सह्याद्री पर्वत सर करतात म्हणजे त्यांच्यामध्ये जी ध्येय ऊर्जा असते ती अव्वल असते. जी व्यक्ती मैदानात उतरून खेळातून आपले कौशल्य दाखवत असते, त्याच व्यक्तीला त्या मैदानामध्ये हरवणारे ही उपस्थित असतात, पण हरणारा खेळाडू पुन्हा नव्या जोमाने, जोशाने खेळून जिंकून दाखवतो. पण जी व्यक्ती मनाने, बुद्धीने पूर्णपणे हारते, ती कधीच जिंकू शकत नाही. जी कांही आपली बौद्धिक ताकत असते त्यावरच सगळे अवलंबून असते. चांगले विचारच माणसाला ध्येय निश्चिती करण्यास भाग पाडतात वा ध्येयापर्यंत पोहोचवू शकतात.

माणसाची खरी हार तेव्हा होत नाही जेव्हा तो विजयी वा यशस्वी होत नाही. माणसाची खरी हार तर तेव्हा होते जेव्हा ती व्यक्ती यशस्वी होण्याचे ध्येयच आखत नाही. केस पांढरे झाले किंवा शरीर थकले म्हणून माणूस म्हातारा होत नाही. तर, जेव्हा नवे लक्ष आखण्याच्या मार्गावर तो मार्गक्रमण करीत नाही खऱ्या अर्थाने माणूस तेव्हा म्हातारा होतो. आपल्या दृढ निश्चया पुढे कोणतीच गोष्ट अशक्य वा असंभव नसते. जोपर्यंत आपण एखादी गोष्ट करण्याची तयारीच दाखवत नाही, त्या गोष्टीबद्दल दृढ निश्चयच करत नाही. तोपर्यंत यश हे आपले नसते. जी व्यक्ती विचाराने, बुद्धीने मजबूत असते त्या व्यक्तीला बाहेरच्या कोणत्याच गोष्टी म्हणजे टेंशन, डिप्रेशन, नर्व्हसनेस जिंकण्यासाठी रोखूच शकत नाहीत. विजय त्याच व्यक्तीचा होतो. जी व्यक्ती मनाने व विचारांनी मजबूत असते. आयुष्य जगत असताना अनेक संकटांना सामोरे जावे लागते.

संकटे पेलत असताना यशाच्या नव्या सोनेरी वाटा शोधाव्या लागतात. पण जर, माणूस संकटांना घाबरून विचारांच्या कमकुवत घरात दडून बसला तर मग संकटे मोठी वाटायला लागतातंच, माणसाची ध्येयनिश्चिती खचू लागते. आणि मग इथूनच हार आणि जीत यांचा प्रवास सुरू होतो. जर, आपले ध्येय पक्के नसेल तर अर्थात आपली ध्येय निश्चिती लांब आहे आणि ध्येय लांब वा दूर म्हटले की मग आपली हार निश्चित आहे. आणि एकदा का आपण हार मानली की मग ही हार मानण्याची सवय लागून जाते.

छोट्या छोट्या गोष्टींना घाबरून जर आपण आपले ध्येय बदलले तर मग आपले मन पुन्हा पुन्हा आपल्याला हेच सांगते की ''अशा संकटांना घाबरून तू कधीच हार मानली आहेस''. मग आयुष्यात काही करून दाखवायचे वय निघून जाते. आणि तिथूनच असफलतेचा, कमकुवत, अयशस्वी व्यक्तीचा प्रवास सुरू होतो. आपण जो इतिहास वाचतो तो इतिहास आपल्यासारख्याच कोण्या एका



व्यक्तीने रचलेला असतो. मग आपण आपला इतिहास रचुन आपल्या इतिहासाचे साक्षीदार का नाही होऊ शकत.? जोपर्यंत आपण करत नाही. तोपर्यंत आपल्याला कोणतेच ध्येय वा ध्येय निश्चितीची इच्छा होत नाही. एक विकलांग व्यक्ती सह्याद्री पर्वत सर करू शकतो, समुद्र पार करू शकतो, पुरे वाळवंट चालू शकतो. तर मग सक्षम व्यक्ती कोणतेही प्रयत न करता नशिबाला दोष देत बसणे हे कितपत योग्य आहे?. माणूस शरीराने नाही विचारांनी विकलांग असतो.

आपल्या प्रबळ इच्छाशक्तीचा वापर पुरेपूर रित्या कसा करावा हे आपल्याच हातात असते. संत कबीर आपल्या दोह्यात म्हणतात, ''माणसाचे नशीब नाही विचार खराब असतात. प्रत्येक गोष्टीत जो बदल घडत असतो त्या बदलाला न घाबरता पुढे जात राहणे हाच तर सर्वांत मोठा बदल असतो. आपण स्वतः मध्ये केलेला. आणि हाच बदल आपल्याला यशाचा नवाकोरा आरसा व त्यातील आपला नवा चेहरा दाखवत असतो. जी व्यक्ती आत मधून मनाने, विचाराने मजबूत असते ती व्यक्ती नवी आव्हाने स्वीकारत असते. प्रत्येक गोष्टीचे उत्साहाने स्वागत करण्यास सज्ज वा तत्पर असते. हार मानणे म्हणजेच हारने होय.

आपण ज्या क्षणी ठरवतो की ''मला जिंकायचे आहे'' त्याच क्षणी आपणा जिंकतो. असे म्हटले जाते की, वाघापेक्षा हरीण जास्त वेगाने धावते, मात्र हरणाच्या मनात सदैव ही भीती असते की, वाघ कधी एकदा माझ्या मागे येऊन मला पकडेल या विचाराने हरिण धावताना हजार वेळेस मागे वळून बाजू पाहत असते. हरणाच्या मनातली ही भीती हरणाला हरवत असते. आणि हरण हारते ही. आकाशाला गवसणी घालत असताना मी तिथे पर्यंत पोहोचू शकेल का? ही भीती मनात न ठेवता, न बाळगता उंच आकाशी झेप घ्यावी, उत्तुंग भरारी घ्यावी. यश निश्चित आहे. हार मानत असलो तर मग जगणे अपयशाने भरून जाईल.

जीत कुठेच नाही हे म्हणत बसल्यास अपयश मनात घर करून बसेल. मी करत असलेले काम नकीच चांगले होणार. मी यशस्वी होणारच. हा विश्वास जर आपणच स्वतःला दिला तर मग अपयश कधीच यशस्वी नशिबाचे दार ठोठावणार नाही. आयुष्य म्हणजे वाहत्या नदी सारखे आहे. नदीचा प्रवाह वेगाने वाहत असतो त्याच प्रवाहात आपण तरंगत राहिलो तरच यशाचा अधांग महासागर पाहू शकू. कोणतेही काम करताना त्या कामाची, आपल्या ध्येयाची, प्रयत्नांची ची, विश्वासाची उंची वाढवावी. मग यश सदैव आपल्यासाठी आपले असते.

''मन के हारे हार है
मन के जीते जीत रे
कहे कबीर हरी पाईये
मन ही की परतीत''

अर्थ: आयुष्यात हार जीत हे तर केवळ आपल्या मनाचे खेळ आहेत. म्हणजे, एखादे कार्य करण्याआधीच आपण जर हार मानली तर आपण त्या कार्यात निश्चितच हारतोत. पण, आपले ध्येय गाठताना आपण पुन्हा पुन्हा पडून उठतो स्वतःला सांभाळत. खऱ्या अर्थाने तेव्हाच आपण त्या कामात पूर्णपणे यशस्वी होतो. आणि हे यश आपल्याला खूप आनंद देत असते. आपण हरलो वा जिंकलो हे ठरवणारे इतर कोणीही नसतात. सर्व गोष्टी आपल्यावरच निर्भर करतात.

देव तारी त्याला.....

ज्योतिर्मय साहित्य

मला आठवतं तसा हा प्रसंग संभाजीनगर येथील मार्च २०१९ सालचाआहे, ज्यावेळी कोव्हिड ची नेमकीच चाहूल लागली होती. राज्यात व देशाच्या विविध भागातून कोव्हिडचे रुग्ण आढळून आल्याच्या बातम्या येत होत्या. केंद्र सरकारने ही या विषयाची गंभीरतेने दखल घेऊन परिस्थिती नूसार उपाय योजना करण्याचे नियोजन सुरु केले होते. या काळात माझ्या पत्नीला सर्दी व खोकल्याचा त्रास सुरु झाला. सर्दी कमी मात्र खोकलाच खुप जास्त येत होता. आमच्या नेहमीच्या होमिओपॅथीच्या डॉक्टरांकडे उपचार चालू होते. औषध चालू होते परंतु काहीच फरक पडत नव्हता. तेंव्हा पत्नीने डॉक्टर मॅडम ला विचारले, मला कोरोनाची लागन तर झाली नाही ना? त्यावर त्या म्हणाल्या तसं काही होणार नाही.

तीन आठवडे झाले तरी काहीच फरक नव्हता. तीला रात्रभर खोकल्याचा त्रास व्हायचा, त्यामुळे झोप नाही, हे पाहून काळजीने मलाही झोप येत नव्हती. ती अगदी त्रासून गेली होती. एके दिवशी तीला असह्य झाले व तीने मला जवळ बोलावून अगदी निर्वाणीच्या भाषेत सांगितले, अहो मला एखाद्या चांगल्या डॉक्टरांना दाखवा, नाहीतर माझे काही खरे नाही. हे सांगतांना तीचा कंठ दाटून आला होता व आवाज खोल गेला होता. मी घाबरलो. आम्ही घरात दोघेच होतो. नंतर मी चौकशी केली असता आमच्या कॉलनीतील आमच्या एका मित्राला असाच एक महिना त्रास झाला होता असे समजले. त्यांनी मला डॉक्टर सहस्त्रबुद्धे यांचे नाव सूचविले. मी लगेच त्यांची अपॉइंटमेंट घेतली व त्यांच्या दवाखान्यात गेलो. त्यांनी तपासले व तातडीने एक्स –रे काढण्यास सांगितले.एक्सरे काढा व मला दाखवा म्हणाले. मी लगेच आमचे ओळखीचे डॉक्टर अजय वरे यांचेकडे गेलो. त्यांनी एक्सरे काढला व मला म्हणाले काका, काही काळजी करु नका. ते डॉक्टर तुम्हाला





योग्य औषध देतील. डॉक्टरांनी एक्सरे बघून औषधी लिहून दिली. मी त्यांना म्हणालो होमिओपॅथी चे औषध चालू आहे, तेही चालू ठेवायचे का? त्यावर त्यांनी फार सुंदर उत्तर दिले, दोन तलवारी एकाच ठिकाणी म्यान होऊ शकत नाही. बाकी सर्व औषध बंद. हा आठ दिवसाचा कोर्स पुर्ण करा. पत्नी त्यांना म्हणाली डॉक्टर मला जास्त पावरच्या गोळ्या देऊ नका, मला त्रास होतो. त्यावर ते म्हणाले, तुम्हाला बरं व्हायचं ना, तर निमूटपणे हे औषध घ्या. विशेष म्हणजे फीस मात्र नाममात्र! मी त्यांना म्हणालो आठ दिवसानंतर परत येतो. तेंव्हा ते म्हणाले येण्याची काही गरज नाही. फोन करुन सांगितले तरी चालेल. त्यांना खात्री होती की आपला पेशंट आठ दिवसात बरा होईल. त्यांच्या या आत्मविश्वासाला खरोखरच दाद द्यावी असच घडलं, कारण आठ दिवसानंतर पत्नीला बरे वाटू लागले. मात्र अशक्तपणा खुपच जाणवत होता. तेंव्हा त्यांनी सांगितले की अशक्तपणा दूर होण्यासाठी काहीच औषध घेण्याची गरज नाही. खाण्यापिण्याने दोन तीन महिन्यात बरे वाटेल. खरोखरच तीन महिन्यानंतर तीची प्रकृती पूर्ववत झाली. आपण केलेले पुण्यकर्म अशारीतीने कामी येते म्हणून आपण नेहमी चांगले कर्म करीत रहावे बाकी देवावर सोडावे....

शास्त्रीनगर दिवाळी पहाट - नरक चतुर्दशीला पं. कैवल्यकुमार गुरव यांचे गायन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – शास्त्रीनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने शहरात सातत्याने दिवाळी पहाटच्या कार्यक्रमाचे आयोजन नरक चतुर्दशीच्या दिवशी केले जाते हे कार्यक्रमाचे २३ वे वर्ष आहे. शहरात दिवाळी पहाट प्रथम सुरू करण्याचा मान शास्त्रीनगर गृहनिर्माण संस्थेला जातो . हा कार्यक्रम लोकवर्गणीतून केला जातो, असे असतानाही याचे सातत्य आणि या कार्यक्रमाचा श्रोतृवृंद हा कलाकारांना आणि रसिकांना समसमान समाधानाची आणि आनंदाची अनुभूती देणारा असतो.

यापूर्वीच्या कार्यक्रमातून अनेक दिग्गज गायक कलाकारांनी आपली कला सादर केली आहे. विशेष म्हणजे तरुण रसिकांचा उदंड प्रतिसाद या कार्यक्रमासाठी श्रोता आणि कार्यकर्ता अशा दोन्ही भूमिकेतून असतो.

या २३ व्या वर्षाच्या दिवाळी पहाट कार्यक्रमासाठी पंडित कैवल्यकुमार गुरव यांना आमंत्रित करण्यात आले आहे. शास्त्रीय संगीता बरोबरच मराठी नाट्य संगीत आणि मराठी भक्ती संगीत, संतांचे अभंग तसेच दत्त संप्रदायातील पदे यावर पंडितजींची विशेष पकड असून रसाळ आणि मधुर स्वरातून व्यक्त होणारं गाणं हे त्यांच्या सादरीकरणाचे विशेष वैशिष्ट्य आहे. सुरुवातीला शास्त्रीय संगीत त्यानंतर नाट्यसंगीत आणि भक्ती संगीत असा हा कार्यक्रम खुलत जाणार आहे.

शास्त्रीनगर गृहनिर्माण संस्थेच्या कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी तसेच दिवाळी पहाट कार्यक्रम संयोजन समितीचे सर्व सदस्य, प्रभागातील सर्व नगरसेवक आणि सोसायटीतील सर्व सभासद व त्यांचे कुटुंबीय आणि शहरातील तमाम संगीत रसिक यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून हा कार्यक्रम दरवर्षी साजरा होतो.

सामाजिक भान सांभाळत ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष रॅम्प करून व्हीलचेअर द्वारे त्यांना रस्त्यापासून कार्यक्रमाच्या ठिकाणी आणण्याचे नियोजन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.


हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून त्याला कुठलीही प्रवेश शुल्क नाही.

नरक चतुर्दशीच्या दिवशी म्हणजेच ८ नोव्हेंबर २०२६ रविवारी सकाळी ६ वाजता शास्त्रीनगर गृहनिर्माण संस्थेच्या उद्यानात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे .जास्तीत जास्त रसिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाठक आणि सचिव पं. विश्वनाथ दाशरथे यांनी केले आहे .


समकालीन कवितेचा मर्मग्रही अनुबंध


ज्योतिर्मय साहित्य

एक संवेदनशील भाष्यकार जेव्हा आपल्या समकालीन काळातील कवितेचा मागोवा घेतो, तेव्हा ते केवळ ग्रंथांचे परीक्षण उरत नाही, तर तो एका सांस्कृतिक प्रवासाचा मर्मग्राही आलेख बनतो. डॉ. प्रभाकर शेळके यांचा समकालीन कवितेचा मर्मग्राही अनुबंध हा ग्रंथ अशाच एका सखोल, आस्वादक आणि चिंतनशील समीक्षेचा उत्तम वस्तुपाठ म्हणून समोर येतो. ठसा प्रकाशन गृहतर्फे प्रकाशित झालेला हा ग्रंथ समकालीन मराठी कवितेतील विविध प्रवाह, तिचे बदलत जाणारे सामाजिक-सांस्कृतिक भान आणि तिच्यातील विद्रोही व सखेद स्वर अतिशय प्रभावीपणे वाचकांसमोर मांडतो.



या समीक्षाग्रंथाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लेखकाचा पूर्वग्रहमुक्त, सर्वसमावेशक आणि आशयाचा तळ ढवळून काढणारा आस्वादक दृष्टिकोन. डॉ. शेळके यांनी केवळ समीक्षा सिद्धांतांची पोपटपंची न करता, कवितेच्या आत्म्याशी थेट संवाद साधला आहे. या ग्रंथातून प्रवास करताना वाचकाला समकालीन मराठी कवितेचे बहुविध पदर स्पष्टपणे उलगडताना दिसतात. एका बाजूला फुले, शाहू, आंबेडकर आणि आण्णा भाऊ साठे यांच्या विचारांची ठाम बांधिलकी मानणारी, क्रांतीचा एल्गार पुकारणारी आंबेडकरी कविता आहे; तर दुसऱ्या बाजूला शेतीमातीची बिकट अवस्था, शोषितांचे प्रश्न आणि कष्टकऱ्यांची सखेद वेदना मांडणारी ग्रामीण-कृषक कविता आहे. याचबरोबर आदिवासींच्या आदिम जगण्यातील भयावहता अन् अस्तित्वाचा संघर्ष मांडणारा आवाज आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या भिंतींना सुरुंग लावून स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची प्रखर जाणीव करून देणारी स्त्रीवादी कविता या ग्रंथात केंद्रस्थानी आहे. ग्रंथातील विविध कवितासंग्रहांचे समीक्षण करताना लेखकाने घेतलेला शोध अत्यंत बारकाव्यांसह येतो. बुद्धभूषण साळवे यांच्या तू शतकांतराचा एल्गार या दीर्घांकाचा वेध घेताना डॉ. शेळके यांनी आंबेडकरी जाणिवांची संयत पण प्रखर धार अधोरेखित केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला समतेचा विचार, संविधानाचे अधिष्ठान आणि सर्वहारा समाजाला दिलेली आत्मभानाची नवी पहाट या कवितेच्या मुळाशी कशी आहे, याचे विश्लेषण ग्रंथकार अत्यंत प्रभावीपणे करतात. **(क्रमशः)**





मुलांसाठी बोधकथा

आर.पी. दुसे, 94 22202747

संकल्प शक्ति यशाची पायरी

पुढे....

मनातून तो वैतागला होता पण काम नाही केले तर पोट कसे भरणार? शिवाय मरणाला सामोरे जावे लागणार हे वेगळेच. ह्या प्रकारची दहशत राक्षसाने त्याच्या मनात भरली होती.

एकदा सर्व काम संपवून तो माणूस विश्रांती साठी बसला होता. तो असा बसलेला पाहून राक्षसाच्या रागाचा पारा एकदम चढला आणि तो ओरडून त्या माणसाला म्हणाला ए, काम चुकार माणसा तुझी ही हिमंत की तू माझ्यासमोर काम सोडून आराम घेत बसलास चल ऊठ लवकर कामाला लाग नसता, मी तुला मारून टाकीन. विनाकारण ह्या राक्षसी दहशतीमुळे तो माणूसही मनस्वी चिडून गेला होता आता त्याचा आत्मसन्मान जागृत झाला त्याच्यातील हिमंत उर्जेने उफाळून आली आणि त्यांनी संकल्प केला की ह्या राक्षसाला मुळीच भ्यायचे नाही. त्याच्या आत्म्यांनी विचार केला की मी माणूस असून बुद्धि माझी शक्ती आहे माझ्या अंगी युक्ती आहे मग मी ह्या दुष्टाला विनाकारण का घाबरतो आहे? आपण जितके ह्याला घाबरतो तितके हा आपल्याला घाबरवून टाकतआहे खाऊन टाकण्याचे आव्हान करीत आहे तेव्हा आता आपले पौरुषत्व, बुद्धि चातूर्य दाखविले पाहिजे म्हणून त्याने विचार केला आणि तो सर्व शक्ती एकवटून राक्षसास म्हणाला अरे राक्षसा मी इतके इमाने इतबारे तू सांगितलेले काम क्षणाची विश्रांती न घेता पूर्ण करतो तरी तू मला धमकावण्याचे कारण काय ? तुला जर मला खाऊन टाकावयाचे असल्यास उशीर कशाला करतोस खाऊन च दाखव ? माणसाची ही हिमंत आणि अंतर्मनातून जागृती पाहून तो राक्षस एकदम गलितगात्र झाला कारण त्याला कष्टाळू मानसाची खरी ताकद माहित होती आणि आता तर त्यानी माझ्याशी दोन हात करण्याचा मनातून संकल्पच बोलून दाखवला होता आणि त्याच जोरावर तो आपल्यावर तुटून पडेल ह्यात संशय नाही. आपला अधःपतन, अपयश त्याला दिसत होते. म्हणून वेळ पाहून तो राक्षस तेथून पळून गेला आणि माणसाचा विजय झाला. त्याची सही सलामत सुटका झाली.

तेव्हा माणूस स्व संकल्पाच्या पूर्ततेसाठी सकारात्मक आव्हान विचारांती करून आपल्या बुद्धि चातुर्याच्या जोरावर यश प्राप्त करूशकतो हेच खरे !

निसर्ग वाचला तरच अन्नधान्य मिळेल! अन्नधान्य मिळाले तरच सर्वसृष्टी वाचेल!

मधुकर निलेगावकर, पुणे ९४२१३७५६९१

पुढे.....

तसेच, विसाव्या शतकात निसर्गाच्या ऋतूमानात बदल होण्यास सुरूवात झाली. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काही दशकातील काही वर्षी योग्य पावसाअभावी महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला होता. त्या काळात थोर समाजसुधारक व लेखक श्री.गोपाळ गणेश आगरकर यांनी " आमच्या गावातील पाण्याचे दुर्भिक्ष " हा लेख लिहिला होता. मला आठवते बहुदा तो लेख धड्याच्या स्वरुपात महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने तो धडा सन १९६५ ते १९७०च्या कालावधीत शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केला होता.त्याकाळी, पाण्याचे किती दुर्भिक्ष्य होते. आणि त्या काळातील लोक त्याचा कसा आणि किती प्रमाणात काटकसरीने वापर करीत होते. याची इत्यंभूत माहिती त्यांनी त्यात नमूद केली होती.सकाळी उठल्यानंतर एक पेलाभर (ग्लासभर) पाण्यातूनच तोंड धुवावे लागत होते. नंतर, स्नानाची तर वेगळीच कहाणी आहे.

एका मोठ्या पातेल्यात पाच लिटर पाणी टाकले जात असे. मध्यभागी खोलगट आकाराच्या न्हाणीघरात (बाथरूममध्ये) बसून आंघोळ केली जात असे . त्यानंतर, त्याच साचलेल्या पाण्यात आंघोळीचे कपडे धुतले जात असत. तेच पाणी बाहेर झाडांना जात असे. ही अतिशयोक्ती नाही. त्या काळात अत्याधुनिक बाथरुम, अत्याधुनिक शौचालय अशी परिस्थिती नव्हती. त्यासाठी,अशी परिस्थिती पून्हा येऊ नये यासाठी एकविसाव्या शतकातील भारत देशातील विशेषतः महाराष्ट्रातील माणसांनी त्यातल्यात्यात शहरातील स्वतःला उच्चभ्रू, श्रीमंत समजणा-या माणसांनी पाण्याचे अनमोल, अमुल्य असे महत्व लक्षात घेणे अत्यावश्यक आहे .शहरातील लोक सोसायटीत पाणी आले नाही की टँकरवाल्याला फोन करुन पाणी मागवतात. म्हणूनच, काही लोक पाणी विकत घेण्याची भाषा करतात. तर त्यांना असे सांगावे वाटते की, "आडातंच पाणी नाही आले तर! पोह-यात कुठून येणार " अशी एक जुनी म्हण आहे. (क्रमशः)

युनिव्हर्सचा मास्टर प्लॅन

ज्योतिर्मय साहित्य

आपणही जगण्याचे नियम ठरवावेत ! सर्वांच्या आयुष्यात ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार, पात्रतेनुसार नशीब किंवा प्रारब्धानुसार कोणाचे तरी स्नेहबंध-संबंध असतात. परंतु त्यातील आपले आवडते संबंध आपल्या रुचीनुसार, आपल्या भावनांच्या दृष्टीनुसार कायम राहावेत आणि त्यांनी फक्त आपलंच असावं, आपल्याशीच संबंध ठेवावेत किंवा जास्त वेळ आपल्याला द्यावा अशी आपली आंतरिक इच्छा असते. कदाचित याला सुद्धा काही जण प्रेम समजतात.

परंतु जग कसे चालायचे हे ठरलेलं आहे. निसर्ग असो अथवा कोणी जगाचा नियंता असो, त्याच्या नियमानुसार कोणत्या क्षणी काय घडणार हे निश्चित आहे. ते घडणं मात्र अटळ असतं. हे घडवणाराच विधाता म्हटलं तरी चालेल. एका अदृश्य शक्तीच्या नियमाने, नियंत्रणाने जग चालत असतं.

युनिव्हर्सचा मास्टर प्लॅन जसा असतो त्याप्रमाणे तो चालतो. यातच परस्पर संबंध सुद्धा आले. दोन जीवांचे, पशु-पक्षी प्राण्यांचे, जीवासोबत आजीवांचे सह-अस्तित्व हा ही त्याचाच भाग आहे.

कुणाचा ऋणानुबंध-संबंध किती दिवसांचा यूनिवर्सच्या मास्टर प्लॅनमध्ये आहे ? हे आपल्याला माहिती नसतं. ते समजायचं असतं, उमजायचं असतं, ओळखायचं असतं आणि तशी समज आपण आपल्या मनाला द्यायची असते.

मात्र याला मन तयार होत नाही. कारण आपलं मन संबंधात गुंतलेलं असतं. माणूस भावनेला अधिक महत्त्व देतो. कारण त्यात त्याची त्यातच आत्मतुष्टी असते. हा संबंध इतकाच नियतीच्या आराखड्यात आहे ही समज फार कमी वेळा, कमी लोकांना, कमी प्रमाणात येते. बहुतेक वेळा ती उशिराच आलेली असते. तोपर्यंत युनिव्हर्सच्या या मास्टर प्लॅनमध्ये आपण ढवळाढवळ करत त्याचे दुष्परिणाम भोगलेले असतात.



म्हणूनच स्वतःच्या इच्छेनुसार ज्याने जितका आपल्याशी संबंध ठेवला तोच युनिव्हर्सचा मास्टर प्लॅन समजावा, नियतीच्या मनातली गोष्ट जाणून घ्यावी. हेच प्रारब्ध आणि हेच नशीब.

घडणाऱ्या गोष्टी घडणारच आहेत. काही घटना अटळ आहेत. आपण संयमाने, समजदारीने इष्ट आणि अनिष्ट संयोगात समभावाने, कठीण काळात जबाबदारीने आयुष्य जगायचे असते. घडायचे ते घडणारच असे म्हणून परिश्रम किंवा कष्ट मेहनत सोडायची नसते. जग जगाच्या नियमाने चालते आहे तर आपणही आपल्या नियमानुसार चालावे.सर्व काही घडत असताना, उघड्या डोळ्यांनी पाहत असताना, वेगवेगळे अनुभव येत असताना आपण कसे चालायचे याचा आराखडा आपल्याकडे असावा. घडणाऱ्या घटनांना समजदारीने, नियमबद्ध संघर्षाने तोंड द्यावे.

परंतु अखेर ही समज यायलाच हवी की सर्व काही आपल्या मनाप्रमाणे घडणार नाही. अशा अवस्थेतच आयुष्यभर चालणे आहे. म्हणूनच आपणही आपल्या जगण्याचे नियम ठरवावेत. कारण जग त्याच्या नियमानुसार चालत आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559